**विनायक गणेश वझे महाविद्यालय,**
**मिठागर रोड, मुंलूंड (पुर्व) - ८१**

दि.०१/०८/२०१७

## नोटीस

फेब्रुवारी / मार्च २०१८ मध्ये १२ वी च्या परीक्षेला बसू इच्छिणा-या खाजगी ( अर्ज क.१७) विद्यार्थ्यांसाठी नाव नोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावयाचे आहे.

**Website :- http://form17.mh-hsc.ac.in**

भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून विहित शुल्क आणि कागदपत्रांसहीत महाविद्यालयात सकाळी १० ते १२.३० या कालावधीमध्ये जमा करावेत. ( Counter No- ६ )

प्रिंट जमा करण्याचा कालावधी दिनांक ०१/०८/२०१७ ते २३/०८/२०१७

K.E.T.'S VAZE COLLEGE 1984

उपप्राचार्य
VICE PRINCIPAL
Junior College
V.G. Vaze College,
Mulund (E), MUMBAI-400 081.

# प्रकटन

मुंबई विभागीय मंडळाअतंर्गत सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविदयालये, विद्यार्थी, पालक तसेच सर्व खाजगी संपर्क केंद्रशाळांना कळविण्यात येते की, माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च 2018 परीक्षेसाठी प्रविष्ठ होण्यासाठी विदयार्थ्यांनी नाव नोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने दिंनाक 31/07/2017 पासून 21/08/2017 या कालावधीत भरावयाचे आहेत. भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून दिनांक 01/08/2017 ते 23/08/2017 या कालावधीत विहित शुल्क व कागदपत्रांसह अर्जावर नमूद केलेल्या शाळा /कनिष्ठ महाविदयालयामध्ये जमा करावी.

संबंधित शाळा /कनिष्ठ महाविदयालयांनी त्यांच्याकडे प्राप्त सर्व अर्ज यादी व शुल्कासह दिंनाक 28/08/2017 पर्यंत विभागीय मंडळात जमा करावेत. याबाबत शाळा/कनिष्ठ महाविदयालयांना अधिक माहितीस्तव स्वतंत्र परिपत्रक मंडळ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

तसेच खाजगी शिबीर व पात्र विदयार्थ्यांना परीक्षेची आवेदनपत्र भरणे आवश्यक असल्याबाबतची सूचना तात्काळ खाजगी विद्यार्थी व पालकांना देण्यात यावी.

प्रत्येक विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा.

संकेतस्थळ

इ.10 वी - **http://form17.mh-ssc.ac.in**

इ.12 वी - **http://form17.mh-hsc.ac.in**

( सि. या. चांदेकर )
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-400 703.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-०४
## खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरण्यासाठी विभागीय मंडळांना सूचना

१. खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी अर्ज (अर्ज क्र.१७) ऑनलाईन पध्दतीने भरण्याबाबत प्रकटन काढून आपल्या विभागीय मंडळ कार्यकक्षेतील माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना याबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी.

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी व इ.१२ वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची दक्षता घ्यावी.

विद्यार्थ्यांनी नांवनोंदणी अर्ज दिनांक ३१/०७/२०१७ पासून ते दिनांक २१/०८/२०१७ या कालावधीत ऑनलाईन (OnLine) भरावयाची आहेत. भरलेल्या अर्जाची प्रिंट काढून दिनांक ०१/०८/२०१७ ते दिनांक २३/०८/२०१७ या कालावधीत विहीत शुल्क व कागदपत्रांसह अर्जावर नमूद केलेल्या शाळा/कनिष्ठ महाविदयालयामध्ये जमा करावी.

संबंधित शाळा/कनिष्ठ महाविदयालयांनी त्यांच्याकडे प्राप्त सर्व अर्ज यादी व शुल्कासह दिनांक २८/०८/२०१७ पर्यंत जमा करावेत.

३. प्रत्येक विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

**संकेतस्थळ**

इ.१० वी - http://form17.mh-ssc.ac.in

इ.१२ वी - http://form17.mh-hsc.ac.in

४. विद्यार्थ्याने अर्ज भरण्याकरीता १) शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र २) आधारकार्ड ३) स्वतःचा पासपोर्ट आकारातील फोटो स्वतःजवळ ठेवावा. ऑनलाईन अर्ज भरताना सदर कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करावयाची आहेत.

५. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. विद्यार्थ्यांचा मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी पुढील संपर्कासाठी अनिवार्य आहे.

६. संपूर्ण अर्ज भरून झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या संपूर्ण भरलेल्या अर्जाची प्रिंटआऊट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत घ्यावी.

७. विद्यार्थ्यांनी अर्ज, विहित शुल्क व मूळ कागदपत्रे अर्जावर नमूद केलेल्या शाळा/कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

८. खाजगी विद्यार्थ्यांसाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे-

इ.१०वी - रू.१०००/- नोंदणी शुल्क + रू. १००/- प्रक्रिया शुल्क (Procesing fee)

इ.१२वी- रू. ५००/- नोंदणी शुल्क + रू. १००/- प्रक्रिया शुल्क (Procesing fee)

९. विद्यार्थ्यांनी शाळेत/क.महाविद्यालयात अर्ज व शुल्क जमा केल्यानंतर संबंधित शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सर्व अर्ज एकत्रित करून पुढील नमून्यातील यादी, मूळ अर्जासोबतची कागदपत्रे व शुल्क संबंधित विभागीय मंडळात जमा करून त्याबाबतची पोहोंच द्यावी. कोणताही विद्यार्थी या सुविधेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

| अ.क्र. | अर्ज क्रमांक | विद्यार्थ्यांचे सपूर्ण नाव | शुल्क (रूपये) | शेरा |
|---|---|---|---|---|